.. svaata.ntrya deviichii vinavaNii ..

# ॥ स्वातंत्र्य देवीची विनवणी ॥

पन्नाशीची उमर गाठली अभिवादन मज करू नका ।
मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी धरू नका ॥
सूर्यकुलाचा दिव्य वारसा प्रिय पुत्रांनो तुम्हा मिळे ।
काळोखाचे करून पूजन घुबडांचे व्रत करू नका ॥
अज्ञानाच्या गळ्यात माळा अभिमानाच्या घालु नका ।
अंध प्रथांच्या कुजट कोटरी दिवाभितासम दडू नका ॥
जुनाट पाने गळुन पालवी नवी फुटे हे ध्यानि धरा ।
एकविसावे शतक समोरी सोळाव्यास्तव रडू नका ॥
वेतन खाउन काम टाळणे हा देशाचा द्रोह असे ।
करतिल दुसरे बघतिल तिसरे असे सांगुनी सुटू नका ॥
जनसेवेस्तव असे कचेरी ती डांकूंची नसे गुहा ।
मेजाखालुन मेजावरतुन द्रव्य कुणाचे लुटू नका ॥
बोथट पुतळे पथापथावर ही थोरांची विटंबना ।
कणभर त्यांचा मार्ग अनुसरा वांझ गोडवे गाउ नका ॥
सत्ता तारक सुधा असे पण सुराहि मादक सहज बने ।
करिन मंदिरी मी मदिरालय अशी प्रतिज्ञा घेउ नका ॥
प्रकाश पेरा अपुल्या भवती दिवा दिव्याने पेटतसे ।
इथे भ्रष्टता तिथे नष्टता शंखच पोकळ फुंकु नका ॥
पाप कृपणता पुण्य सदयता संतवाक्य हे सदा स्मरा ।
भलेपणाचे कार्य उगवता कुठे तयावर भुंकु नका ॥
गोरगरीबा छळू नका ।
पिंड फुकाचे गिळू नका ।
गुणीजनांवर जळू नका ।
उणे कुणाचे दिसता किंचित देत दवंडी फिरू नका ।
मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी धरू नका ॥ १॥

परभाषेतहि व्हा पारंगत ज्ञानसाधना करा तरी ।
माय मराठी मरते इकडे परकीचे पद चेपु नका ॥
भाषा मरता देशहि मरतो
, संस्कृतिचाही दिवा विझे ।

गुलाम भाषिक होउनि अपुल्या प्रगतीचे शिर कापु नका ॥
कलम करी ये तरी सालभर सण शिमग्याचा ताणु नका ।
सरस्वतीच्या देवळातले स्तंभ घणाने तोडु नका ॥
पुत्र पशूसम विकती ते नर
, नर न नराधम गणा तया ।
पर वित्ताचे असे लुटारू नाते त्याशी जोडु नका ॥
स्वच्छ साधना करा धनाची वैरागीपण नसे बरे ।
सदन आपुले करा सुशोभित दुसऱ्याचे पण जाळू नका ॥
तरुणाईचे बळ देशाचे जपा वाढवा तरूपरी ।
करमणुकीच्या गटारगंगा त्यात तयाला क्षाळु नका ॥
सुजन असा पण कुजन मातता हत्यार् हातामधें धरा ।
सौजन्याच्या बुरख्याखाली शेपुट घालुन पळू नका ॥
करा कायदे परंतु हटवा जहर जातिचे मनातुनी ।
एकपणाच्या मारुन बाता ऐन घडीला चळू नका ॥
समान मानव माना स्त्रीला तिची अस्मिता खुडू नका ।
दासी म्हणुनी पिटू नका वा देवी म्हणुनी भजू नका ॥
नास्तिक आस्तिक असा कुणीही माणुसकीतच देव पहा ।
उच्च नीच हा भेद घृणास्पद उकिरड्यात त्या कुजू नका ॥
माणुस म्हणजे पशू नसे ।
हे ज्याच्या हृदयात ठसे ।
नर नारायण तोच असे ।
लाख लाख जन माझ्यासाठी जळले मेले विसरु नका ।
मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी धरू नका ॥ २॥

कुसुमाग्रज

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999